ISBN : 978-81-929395-6-8

Gokhale Education Society's

# H.P.T. ARTS & R.Y.K. SCIENCE COLLEGE

Prin. T. A. Kulkarni Vidyanagar, Nashik - 422 005.
Permanently affiliated to the University of Pune
ISO 9001 : 2008 Certified • NAAC Accredited : 'A' Grade

# PROCEEDINGS

**UGC Sponsored**
**Two Days National Seminar**
**on**
**"Impact of Namdar Gopal Krishna Gokhale's Thoughts and Vision on Modern Indian Development"**
**30th & 31st January 2015**



*Public life must be spiritualized. Love of country must so fill the heart that all else shall appear as of little moment by its side....*

G. K. Gokhale

**Chief Editor : Principal V. N. Suryavanshi**
**Executive Editor : Prof. Mrs. R. A. S. Singh**
**Editor : Dr. Pallavi Thakur**

ISBN No. : 978-81-929395-6-8


| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5 | 5 | A Pioneer: One of the Earliest leaders of the Indian National Congress | Hemant Thakare | 42 |
| 6 | 6 | ना. गोपाळ कृष्ण गोखले एक द्रष्टे सुधारक | प्रा.श्रीमती पंकजा अहिरे | 46 |
| 7 | 7 | आदर्श भारत सेवक गोपाळ कृष्ण गोखले | प्रा.डॉ.वाय.एम. साळुंके | 49 |
| 8 | 8 | भारतीय स्वातंत्र्यलढयातील थोर स्वातंत्र्यसेनानी : ना. गोपाळ कृष्ण गोखले | प्रा.एम.ए.सानप | 52 |
| 9 | 9 | गोखले एक उदारमतवादी समाज सुधारक | प्रा. शिवाजी गायकवाड | 57 |
| 10 | 10 | नामदार गोपाळकृष्ण गोखले यांचा सामाजिक दृष्टीकोन एक अभ्यास | प्रा. पौळ भावना श्रीपती | 61 |
| 11 | 11 | नामदार गोपाळ कृष्ण गोखलेंचे सामाजिक योगदान विशेष संदर्भ 'भारत सेवक समाज' | प्रा. डॉ. पल्लवी ठाकूर | 66 |
| | | Educational / शैक्षणिक | | |
| 12 | 1 | Educational Thought of Gopal Krushna Gokhale | Prof. V. M. Pawar | 71 |
| 13 | 2 | Namdar Gopal Krishna Gokhale :Contribution and Vision as an Educationist and Its Impact | Chetan Jadhav | 77 |
| 14 | 3 | नामदार गोपाळ कृष्ण गोखले : शैक्षणिक विचार | प्रा. शिंदे प्रविण कारभारी | 80 |
| 15 | 4 | ना. गोपाळकृष्ण गोखले यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान | श्रीमती सी.बी. भोज | 83 |
| 16 | 5 | शिक्षणतज्ञ म्हणुन गोखलेंचे शिक्षणातील योगदान व दृष्टीकोन | डॉ. मनिषा अनिल कचवे | 85 |
| 17 | 6 | ना. गोखलेंची शिक्षणतज्ञ म्हणून दृष्टी व योगदान | डॉ. हिरालाल बावा | 88 |
| 18 | 7 | ना.गोपाळकृष्ण गोखले यांचे शैक्षणिक विचार | डॉ.ढेकणे के.डी., श्रीमती इंदीरा लोखंडे | 91 |
| 19 | 8 | नामदार गोपाळ कृष्ण गोखल्यांचे शिक्षण विषयक विचार | डॉ. आर. पी. भामरे, प्रा. शशिकांत जी. साबळे | 94 |

 ISBN No. : 978-81-929395-6-8

# आदर्श भारत सेवक गोपाळ कृष्ण गोखले

प्रा.डॉ.वाय.एम.साळुंके
कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, ओझर (मिग) ता.निफाड जि.नाशिक

भारतातील ब्रिटीश साम्राज्याविरुध्द कायदेशीर राजकारणाच्या मार्गाने स्वातंत्र्यलढ्याचा पाया घालणाऱ्या राजकीय व सामाजिक नेत्यापैकी गोपाळ कृष्ण गोखले एक होते.महात्मा गांधी म्हणतात'' फिरोजशहा मेहता मला हिमालयासारखे वाटले,आणि टिळक सागराप्रमाणे ! पण गोखले मात्र मला भासले शांत,निर्मळ, पवित्र.'' यातुन गोखलेचा मोठेपणा स्पष्ट होतो आपल्या ५० वर्षाच्या आयुष्यात प्राथमिक ते उच्चशिक्षण घेतांना संघर्ष करत गणित विषय घेवून बी.ए.एल्फीस्टन कॉलेज मुंबई येथे केले. इतिहास आणि अर्थशास्त्रचे प्राध्यापक म्हणुन पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेज मध्ये काम केले. पुढे मुंबई विद्यापीठ च्या सिनेट वर फेलो म्हणुन रुजु झाले. त्यातुन पुढे गोखलेंचा न्या रानडे यांच्याशी संबध आला. गोखल्यांच्या व्यक्तीमत्वाने रानडे प्रभावित झाले. त्यांनी गोखलेंवर अनेक जबाबदाऱ्या टाकल्या. त्यांना सार्वजनिक सभेचे मंत्री नेमण्यात आले.१८९९ ला भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये सामील झाले. केंद्रीय कायदेमंडळाचे सभासद, भारत सेवक समाज या संघटनेची स्थापना असा मार्गक्रमण करतांना गोखल्यांनी आपले ब्रिटीशांच्या साम्राज्यात मांडलेले राजकीय व सामाजिक विचार आधुनिक विचारप्रणालीली जन्म देणारे ठरले.(१)

कोणत्याही घटकावरचे राजकीय, सामाजिक, आर्थिक विचार परस्परांशी निगडीत असतात फक्त हे विचार विश्लेषणात्मक पध्दतीने वेगळे करुन त्याचे विश्लेषण करणे साठी आपल्याला गोखल्यांच्या ब्रिटीश साम्राज्यातील राजकीय, सामाजिक विचार पुढील प्रमाणे मांडता येतील. मानवाचा शाररिक,बौध्दिक,नैतिक विकास झाल्याशिवाय राष्ट्रवाद ही भावना निर्माण होवू शकत नाही. निस्वार्थी भावनेने जनसेवा करणे हिच राष्ट्रसेवा व देशभक्ती आहे असे प्रतिपादन गोखल व रानडे करत असत.

### ब्रिटीशांच्या आधुनिक विचारसरणी आत्मसात करणारे परंतु धोरणावर टिका करणारे गोखले.

मवाळ विचाराचे आणि घटनात्मक मार्गावर श्रध्दा ठेवणारे गोखले स्वातंत्र्यप्रेमी होते. परंतु ब्रिटीश विचारसरणीवर जहालवादी व क्रांतीकारक नेत्यांबरोबर त्यांचे मतभेद झाले. दादाभाई नौरोजी प्रमाणे गोखलेंचा ब्रिटीशांच्या सद्सदविवेक बुध्दीवर विश्वास होता. म्हणुनच १९०२ मध्ये गोखल्यांनी अर्थसंकल्पावर भाष्य करतांना सांगितले की, आपल्याला भारतीयांचे भले करणारे शासन हवे आहे, मग ते परकीयांचे असले तरी चालेल. ब्रिटीश जनतेला हे हक्क मिळतात ते भारतीय जनतेला मिळावेत. भारतीयं जनतेचे नैतिक व भौतिक हितसंबध भारतात वाढावेत आणि भारताबाहेर ही वाढावेत हाच खरा प्रागतिक साम्राज्यवाद आहे. साम्राज्यवाद संकुचित नसावा. ब्रिटीशांनी आपल्या सर्व प्रजेत समतेची आणि स्वातंत्र्याची भावना निर्माण करावी. म्हणजेच गोखले भारतीयांनी ब्रिटीशांच्या साम्राज्यवादातुन प्रागतिक विचारांचे शिक्षण घेण्यास सांगत होते.

गोखले ब्रिटीश राजवटीचे राजकीय विचारांचे समर्थन करत होते परंतू त्याचबरोबर ब्रिटीश नोकरशाहीवर टिका पण करत होते. ब्रिटीश प्रशासन,नोकरशाहीवर केलेली गोखलेंची टिका कोणत्याही जहाल नेत्यापेक्षा कमी नव्हती. भारतीय जनतेच्या पैशांतून ब्रिटीश नोकरशाहीची उधळपट्टी त्यांना मान्य नव्हती.

गोखलेंनी न्या.रानडे यांच्या प्रमाणे ब्रिटीश शासन दैवी वरदान आहे व भारताला पुर्ण स्वातंत्र्याला पोषक असे राष्ट्रीय वातावरण नाही असे वाटत होते. म्हणुनच भारतीय जनतेत राष्ट्रवादाचा पाया मजबुत करण्यासाठी लोकांमध्ये सामाजिक कार्यक्षमता,नैतिक चारित्र्य निर्माण करण्यासाठी त्यांनी १२ जून १९०५ मध्ये भारत सेवक समाजाची स्थापना केली. या संघटनेच्या माध्यमातून जातीभेद निर्मुलन, वाईट प्रथा मोडणे या सामाजिक घटकांबरोबर राजकीय आणि सामाजिक जीवनाचे आध्यात्मिकरण करणे, लोकांमध्ये देशभक्ती वाढविणेचे उद्दीष्ट होते. गोखलेंची साध्य, साधन शुचिता या

 ISBN No. : 978-81-929395-6-8

संकल्पना पुढे म.गांधीनी विकसित केल्या.(२)

गोखलेंनी जहालांच्या स्वदेशी चळवळीला पाठींबा दिला. स्वदेशीचा संबध त्यांनी मातृभुमीच्या श्रध्देशी जोडला. इ.स.१९०५ च्या बनारस येथे भरलेल्या कॉंग्रेसच्या अध्यक्षीय भाषणात गोखले म्हणतात ''खरी स्वदेशी चळवळ ही देशभक्ती आणि आर्थिक स्वालंबनाची चळवळ आहे.'' गोखल्यांना भारताच्या आर्थिक समस्यांची जाणीव होती. त्यासाठीच त्यांनी स्वदेशीचे समर्थन केले. मात्र जहालांचे स्वदेशी चळवळीचे जहाल मार्ग त्यांना मान्य नव्हते. बनारस अधिवेशनात गोखलेंनी पुढील मागण्या मांडतांना कायदेमंडळात भारतीय सदस्य संख्या वाढवणे, इंडियन कौन्सिल कमितकमी ३ सदस्य असावे, प्राथमिक शिक्षणात वाढ, लष्करावरील खर्च कमी करणे, तांत्रिक शिक्षण देणे अशा मागण्यांमधून राजकीय मवाळ तत्वज्ञान मांडले. इ.स.१९०६ च्या आपल्या अंदाजपत्रकीय भाषणात गोखले म्हणतात '' जनतेची स्थिती सुधारणे आणि सुशिक्षित लोकांमध्ये सामंजस्य निर्माण करणे हे दोन महत्वाचे प्रश्न ब्रिटीश शासना पुढे आहेत, त्यासाठी राज्यकारभार आणि प्रशासन यात भारतीयांचा सहभाग वाढला पाहीजे.''

गोखलेंचा विशेष भर विकेंद्रीकरणावर होता. खालच्या घटकात ग्रामपंचायत,मधल्या पातळीवर जिल्हा मंडळ, वरच्या पातळीवर कायदेमंडळ असावे. त्यात इंग्रजी शिक्षण घेवून याबाबत जनतेने बौध्दिक पातळी वर विकसित व्हावे. अशी गोखलेंची धारणा होती. गोखल्यांनी राजकीय आध्यात्मिकरणार spiritualization of Politics भर दिला. धर्म म्हणजे मानवता, नितीमत्ता आहे राजनिती मध्ये धर्म म्हणजे मानवधर्म म्हणजेच सदाचरणाला महत्व दिले पाहिजे,हाच गोखलेंचा साध्य -साधन-शुचिता मार्ग साध्य प्राप्तीसाठी म.गांधीनी स्विकारला.

**गोखलेंचे सामाजिक विचार :**

गोखलेंच्या सामाजिक तत्वज्ञानाचा आढावा घेतांना उदारमतवाद,पाश्चात्य शिक्षण,सांप्रदायिक ऐक्य, आर्थिक विचार इ. घटकांचा अभ्यास करावा लागतो. गोखल्यांच्या इंग्रजांच्या राजकीय व्यवस्थेतुन भारतीय सामाजिक ऐक्य मार्गक्रमणावर विशेष विश्वास होता. भारतात ब्रिटीशांनी इंग्रजी भाषेची दालने खुली केल्याने भारतीयांना लोकतांत्रिक संस्थेविषयी माहिती झाली. ब्रिटीश राजनितीतून भारतीयांनी स्वःसामाजिक विकास करुन राष्ट्रवाद निर्माण करावा म्हणुन जोपर्यंत सामाजिक शिक्षण मिळत नाही तोपर्यंत पुर्ण स्वातंत्र्यावर जोर देवू नये असे उदारमतवादी धोरण गोखलेंनी स्पष्टपणे मांडले.

भारतात हिंदु व मुस्लीम हे दोन महत्वाचे धर्म आहेत.या दोन्ही संप्रदायाच्या लोकांनी परस्परातील मतभेद विसरणे, संयमाने संहिष्णू वृत्तीने कार्य करुन प्रेम बंधुता वाढविणे आवश्यक आहे. त्यांच्या याच विचारांचा प्रभाव गांधीजींवर होता.

गोखल्यांना कृषी व उद्योग या सारख्या सामाजिक घटकांची जाण होती हे त्यांच्या वरिष्ठ कायदेमंडळातील भाषणांवरुन दिसुन येते. २६ मार्च १९०२ रोजी वरिष्ठ कायदेमंडळात त्यांच्या अंदाजपत्रिकेवरील भाषणात गोखले म्हणतात '' शिलकी अंदाजपत्रक म्हणजे भारतीयांवरील दुहेरी अन्याय होता.नैसर्गीक संकटे ,रोगराई या सकंटानी जनता त्रस्त झालेली असतांना त्या संकटाच्या निवारणार्थ पैसा खर्च न करता तो शिल्लक टाकणे हा त्यांना एक अन्याय वाटत होता.शासनाने शिल्लक राहिलेला हा पैसा प्रशासन व लष्कर यावर खर्च होणार होता. हा पैसा शिक्षण, पाटबंधारे, आरोग्य यासारख्या उपयोगी गोष्टींवर खर्च केला जावा त्यातून जनकल्याण साधले जावे.''(३)

गोखलेंनी म.गांधीना समाजकारणाचे मार्गदर्शन करतांना सांगितले '' तुम्ही एक वर्ष भारतीय राजकारणावर लक्ष ठेवा आणि राजकीय चळवळ सुरु करु नका.'' परंतू गांधीजींनी गोखलेंचा हा उपदेश पुर्णपणे अंमलात आणला नसला तरी सर्व धर्म समभाव विचार घेतला, भारतीय राजकारणात हिंसाचार वाढणार नाही याची काळजी गांधीजींनी घेतली.

सामाजिक विचारांच्या बाबतीत गोखले व लो.टिळक यांच्यात मतभेद होते परंतू व्यक्तिगत स्वरुपाचे मतभेद नव्हते. टिळक म्हणतात '' राजनिती शास्त्रामध्ये आणि राजकारणामध्ये आध्यात्मिक आणि नैतिक भावनेला प्राधान्य देणारा एक सर्वोत्कृष्ठ कार्यकर्ता '' या शब्दात गोखल्यांचा सन्मान केला.

नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांनी आदर्श लोकप्रतिनिधी चा वस्तुपाठ आचरणातून घालून दिला. केंद्रीय विधीमंडळात भारतावरच्या सामाजिक प्रश्नांना वाचा फोडतांना चर्चेची गुणवत्ता वाढविली. त्यांचे भाषणातील युक्तीवाद त्यासाठी दिलेले

 ISBN No. : 978-81-929395-6-8

आधार पाहिले की वैधानिक मार्गाची परिणामकारकता लक्षात येते.

**गोखलेंच्या विचारांची समिक्षा :**

न्या.रानडे यांचे शिष्य म.गांधी यांचे गुरु अशी दुहेरी जबाबदारी गोखलेंनी व्रतस्थपणे सांभाळली. म.गांधींनी ज्यांचा उल्लेख 'महात्मा' असा केला. गांधीजींच्या सुरवातीच्या पत्रव्यवहारात 'महात्मा गोखले' असा उल्लेख सापडतो. गोखले यांनी साकारलेल्या राजकारणाच केंद्र नैतिकदृष्या किती श्रेष्ठ प्रतीच होत याची गांधीजींनी दिलेली हि साक्ष आहे. देशाच्या राजकारणावर प्रभाव टाकुन त्याला निर्णायक वळण देण्याचे कतृत्व गोखले यांनी आपल्या ३० वर्षाच्या राजकीय कारकिर्दीत गाजवलं. १९०५ मध्ये बंगालच्या फाळणीचा निर्णय घेवून ज्यांनी भारतात प्रचंड असंतोष निर्माण केला त्या लॉर्ड कर्झनशी अर्थसंकल्पावरुन गोखलेंशी जोरदार संघर्ष झाला होता. तोच कर्झन गोखलेंना आदरांजली वाहतांना म्हणतो '' माझ्या कारकिर्दीत गोखले कायदेमंडळाचे सभासद होते ते जनू विरोधी पक्षाचे नेते होते.त्यांच्या टिकेचा मारा मला सहन करावा लागला. परंतू मी हे सांगु इच्छितो की, ज्यास संसदीय कर्तृत्व म्हणतात ते गोखले यांच्या पाशी इतके होते तितक कर्तृत्व असलेली दुसरी व्यक्ती मला भेटलेली नाही. त्यांच्या संसदीय कौशल्यांच्या जोरावर ते जगाच्या कोठल्याही संसदेत, ब्रिटीश संसदेत ही नावाजले गेले असते.''(४)

पुणे येथे झालेल्या शोकसभेत गांधीजी आपल्या राजकीय गुरुला श्रध्दांजली अर्पण करतांना म्हणतात '' ज्यांच आयुष्य सर्मपित आहे, ज्याची राहणी साधी आहे , जो सत्याचा पुतळा आहे, ज्यात अपरिग्रह केला आहे जो मानवतावादी आहे तो गोखले यांच्या सारखा माणुस धार्मिकच म्हटला पाहिज,गोखले स्वःताला धार्मिक मानोत ना मानोत '' धार्मिकतेच्या गांधीच्या व्याख्येत गोखले हे चपखल बसत होते.

गोखले यांच्या नावामागे लागलेल्या '' भारत सेवक, नेकनामदार''या उपाधी सार्थ होत्या. देशसेवा त्यासाठी उदारमतवादी विचारसरणी आणि सनदशीर मार्ग यावर त्यांची श्रध्दा होती. म्हणुनच गोखलेंनी तत्कालीन काळात भारताला पुर्ण स्वातंत्र्याची ही वेळ नाही हे स्पष्ट केले म्हणजेच भारतीयांनी राजकीय व सामाजिक जीवनाचे शिक्षण व तत्व घेवूनच पुढे स्वातंत्र्याची इमारत पक्क्या पायावर उभी केली पाहिजे, असा दृष्टकोन गोखलेंचा होता.

**संदर्भ साधने :**

१. जोशी लक्ष्मण शास्त्री, संपादक मराठी विश्वकोष, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ,मुंबई
२. डॉ.साबळे आर.डी. भारतीय राजकीय विचार, हिमालया पब्लिशींग हाऊस,मुंबई
३. गद्रे आशा, गोपाळ कृष्ण गोखले , डायमंड पब्लिकेशन,पुणे
४. फाटक न. र., आदर्श भारत सेवक, मुंबई,१९६७